# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग

## // प्रेस नोट //

मिरा-भाईदर शहरातील तमाम नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

मिरा-भाईदर शहर हे संबंधित मुख्य जलस्त्रोतांपासून सुमारे 30 ते 40 किलोमीटर इतक्या अंतरावर असुन पाणी पुरवठा योजनेच्या शेवटच्या टोकाला आहे.

शहरास शुद्ध पाण्याचा पुरवठा होत असुन पाण्याची शुद्धता कायम राखण्याची खबरदारी वेळोवेळी महानगरपालिकेकडून घेण्यात येत असते. तथापि सद्यस्थितीत पावसाळयाचे दिवस सुरु असल्याने पाण्याची शुद्धता शेवटपर्यंत कायम राखणेकामी नागरीक / रहिवाशी / सोसायटीधारक यांचेकडून सहकार्य अपेक्षित आहे. त्याकरीता नागरीकांनी पुढीलप्रमाणे दक्षता घेणे आवश्यक आहे.

- घर / बंगला / इमारत संकुल यांच्या जलजोडण्यांच्या पाईपची नियमित देखभाल-दुरुस्ती करणे. गंजलेले-जिर्ण झालेले पाईप बदलणे.
- जलजोडण्यांच्या जलमापक यंत्राची साफसफाई तसेच देखभाल-दुरुस्ती करणे.
- जलमापक यंत्राकरीता बांधण्यात / बनविण्यात आलेल्या चेंबरची नियमित देखभाल-दुरुस्ती करणे, साफसफाई ठेवणे.
- घर / बंगला / इमारत संकुलातील भुमीगत पाण्याच्या साठवण टाक्यांच्या परिसराची देखभाल दुरुस्तीची कामे करुन साफसफाई ठेवणे.
- भुमीगत पाणी साठवण टाकीची देखभाल-दुरुस्ती करुन साफसफाई ठेवणे तसेच गळती प्रतिबंधक उपाययोजना करणे.
- घर / बंगला / इमारत संकुलाच्या छतावरील पाणी साठवण टाक्यांची (Overhead Water Tank) देखभाल-दुरुस्ती व साफसफाई करणे

तरी, मिरा-भाईदर शहरातील तमाम नागरीकांना आवाहन करण्यात येते की, पावसाळयाच्या दिवसांत पाण्याव्दारे बळावणारे आजार (डेंग्यु, मलेरिया, डायरीया) इत्यादींपासून बचावासाठी पाणी उकळून व गाळून प्यावे तसेच वरीलप्रमाणे दक्षता घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका